# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, पोलीस जिमखाना शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१

ईमेलव्दारे

क्रमांक कक्ष-१०(२)/३/प्र.क्र.१६९(१७-१८)/२५२९
नागपूर ४४०००१ दिनांक ४/२/२०१९.

प्रति,
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक) (सर्व)

विषय वनरक्षक व वनपालाचे बदलीबाबत.

संदर्भ १) महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांकः- एफएफएस-२०१६/ प्र.क्र.१४३/ फ-८, दिनांक २२ मे २०१७.

२) शासन निर्णय क्रमांकः-एफएसटी-१२/१७/प्र.क्र.६६४/फ-४,दि.११.१.२०१८.

३) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/तीन/प्र.क्र.१६९(१७-१८)/२४३३, दि.९.३.२०१८

वनरक्षक व वनपालांचे बदली संदर्भात उपरोक्त संदर्भीत शासन निर्णयान्वये बदली धोरण अंमलात आले असून ते खालीलप्रमाणे आहे.

वनरक्षक

i) वनरक्षक पदावर नियुक्ती झाल्यावर प्रथम नियुक्ती देतांना वन्यजीव शाखेला प्राधान्य देण्यात यावे.

ii) वन्यजीव/सामाजिक वनीकरण/इतर शाखेमध्ये एक पदावधी पूर्ण केल्यावर प्रादेशिक वन विभागात बदली करण्यात यावी.

iii) एका प्रादेशिक वन परिक्षेत्रात सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करुन त्यानंतर वन विभागाचे आस्थापनावरील इतर शाखामध्ये जसे वन्यजीव / सामाजिक वनीकरण/ कार्य-आयोजना/संशोधन/मुल्यांकन येथे बदली आवश्यक राहील. जर इतर शाखेमध्ये पद उपलब्ध नसेल किंवा काही अपवादात्मक स्थिती उद्भवली तर बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाकडून याबाबत लेखी कारणे नमूद करुन दुस-या प्रादेशिक वन परिक्षेत्रात वन्यजीव/ सामाजिक वनीकरण/कार्य आयोजना/ संशोधन/ मूल्यांकन शाखेत बदली करता येईल.

iv) जर प्रशासकीय कारणास्तव एखाद्या वनरक्षकाची एकाच प्रादेशिक परिक्षेत्रात दोन पेक्षा जास्त पदावधी ठेवण्याची गरज असेल तर अशा स्थितीमध्ये बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्यांचे लगतचे वरिष्ठ बदलीस सक्षम प्राधिकारी यांच्या पुर्व परवानगीनेच त्या वनरक्षकाची त्याच वनपरिक्षेत्रामध्ये बदली करता येईल. याबाबत संबंधिताच्या आदेशात वरिष्ठ प्राधिका-यांची मान्यता घेतल्याबाबत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.

v) तपासणी नाका या पदावर फक्त एकच पदावधीची सेवा करता येईल.

vi) एखाद्या शाखेमधील कामामध्ये पारंगत/प्राविण्यप्राप्त असलेल्या वनरक्षकाची जर इच्छा असेल आणि प्रशासकीय आवश्यकता असेल तर अशा वनरक्षकास त्या शाखेमध्ये पुढील कमाल ३ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवता येईल.तद्नंतर अशा कर्मचा-यांची इतर शाखेत बदली करणे बंधनकारक राहील.

vii) प्रादेशिक शाखेत कार्यरत असलेल्या एखाद्या वनरक्षकाची वन्यजीव,कार्य-आयोजना, मुल्यांकन,संशोधन किंवा इतर शाखेमध्ये काम करण्याची आवड व सहमती असेल, तसेच तो त्याबाबतचे प्राविण्य धारण करीत असेल तर अशा वनरक्षकाची बदली व पदोन्नतीने पदस्थापना प्राधान्याने प्रशासकीय आवश्यकतेनुसार इतर संबंधित शाखेमध्ये करता येईल.

वनपाल

i) वनपाल पदावर नियुक्ती/ पदोन्नती झाल्यावर, त्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी असेल तर प्रथम पदस्थापना देतांना वन्यजीव शाखेला प्राधान्य देण्यात यावे. तसेच ५० वर्षापेक्षा अधिक वय असणा-यांना प्रादेशिक/सामाजिक वनीकरण/इतर विभागात पदाच्या उपलब्धतेनुसार पदस्थापना द्यावी. परंतु ५० वर्षापेक्षा वय असणा-यांना प्रादेशिक वन विभागात पदस्थापना करणे बंधनकारक राहणार नाही.

ii) वन्यजीव/सामाजिक वनीकरण/इतर शाखेमध्ये एक पदावधी पूर्ण केल्यावर प्रादेशिक वन विभागात बदली करण्यात यावी.

iii) एका वनवृत्तातील एका प्रादेशिक वन विभागामध्ये सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करुन त्यानंतर वनवृत्ताचे आस्थापनावरील इतर शाखामध्ये जसे वन्यजीव / सामाजिक वनीकरण / कार्य-आयोजना / संशोधन / मुल्यांकन / इतर शाखा येथे बदली करणे आवश्यक राहील.जर इतर शाखेमध्ये पद उपलब्ध नसेल किंवा काही अपवादात्मक स्थिती उदभवली तर बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाकडून याबाबत लेखी कारणे नमूद करुन दुस-या प्रादेशिक वन विभागात बदली करु शकेल.

जर प्रशासकीय कारणास्तव दखाद्या वनपालाची एकाच प्रादेशिक वन विभागात दोन पेक्षा जास्त पदावधी ठेवण्याची गरज असेल तर अशा स्थितीमध्ये बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्यांचे लगतचे वरिष्ठ बदलीस सक्षम अधिकारी यांच्या पुर्वपरवानगीनेच त्या वनपालाची त्याच वन विभागामध्ये बदली करता येईल.

vi) पदोन्नतीनंतर तपासणी नाका व आरागिरणी तपासणी या पदावर फक्त एकच पदावधीची सेवा करता येईल.

v) एखाद्या शाखेमधील कामामध्ये पारंगत/ प्राविण्य प्राप्त असलेल्या वनपालाची जर इच्छा असेल आणि प्रशासकीय आवश्यकता असेल तर अशा वनपालास त्या शाखेमध्ये पुढील कमाल ३ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवता येईल. तद्नंतर त्याची बदली अन्य शाखेत करणे बंधनकारक राहील.

परंतु असे की,एखाद्या कार्यरत वनपालाची वन्यजीव, कार्य-आयोजना, मूल्याकंन, संशोधन किंवा इतर शाखेमध्ये काम करण्याची आवड व सहमती असेल तसेच तो त्याबाबतचे प्राविण्य-

धारण करीत असेल तर,अशा वनपालाची बदली व पदोन्नती पदस्थापना प्राधान्याने प्रशासकीय आवश्कतेनुसार इतर संबंधित शाखेमध्ये करता येईल.

२. काही वनवृत्ताकडून या कार्यालयाकडे प्राप्त होणा-या वनरक्षकांचे मध्यावधी बदली प्रस्तावाचे अवलोकन केले असता, एका प्रादेशिक वन परिक्षेत्रात सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करुन त्यानंतर वनविभागाचे आस्थापनावरील इतर शाखामध्ये जसे वन्यजीव/सामाजिक वनीकरण/कार्य-आयोजना/संशोधन/मुल्यांकन येथे बदली बंधनकारक असूनसुध्दा त्या ठिकाणी बदली न करता वेगवेगळे कारण दर्शवून पुन्हा प्रादेशिक परिक्षेत्रात बदलीसाठी प्रस्तावित प्रस्ताव सादर करण्यात आले होते. तसेच वनपालांचे काही बदली प्रस्तावाचे अवलोकन केले असता, एका प्रादेशिक वन विभागामध्ये सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करुन त्यानंतर वनवृत्ताचे इतर शाखामध्ये जसे वन्यजीव / सामाजिक वनीकरण / कार्य-आयोजना / संशोधन / मुल्यांकन / इतर शाखा येथे देणे बंधनकारक असून सुध्दा त्या ठिकाणी बदली न करता वेगवेगळे कारण दर्शवून पुन्हा प्रादेशिक विभागात बदली प्रस्तावित करुन प्रस्ताव सादर केल्या जाते.सदर बाब महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक एमएफ एस-२०१६/प्र.क्र.१४३/फ-८, दिनांक २२.५.२०१७ ची उल्लघंन करणारी असून हे योग्य नाही. अधिकारी कर्मचा-यांच्या बदल्या करताना दिनांक २२.५.२०१७ मधील तरतूदीचे काटेकोरपणे पालन करुनच बदल्या केल्या जातील याची दक्षता घ्यावी.

३. वनरक्षक व वनपाल संवर्गाचे बदलीचे प्रस्ताव विहित प्रपत्रातच सादर करणेबाबत या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांना यापूर्वी सूचना देण्यात आलेले आहे.परंतु काही वनवृत्ताकडून वनरक्षक व वनपालाचे बदलीचे प्रस्ताव महसूल व वन विभाग,शासन निर्णय क्रमांकः एफएसटी-१२/१७/प्र.क्र.६६४/फ-४,दिनांक ११.१.२०१८ मधील तरतूदीनुसार प्रस्ताव सादर केल्या जात नाही. त्यामुळे सदरहू प्रस्तावाची त्रुटीची पूर्तता करणेकरिता वनवृत्त कार्यालयाकडे परत पाठविल्या जाते,त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देण्यास विलंब होतो. तसेच यापुढे वनरक्षक वनपालांचे मध्यावधी बदलीचे प्रस्ताव सादर करताना शासन शुध्दीपत्रक दिनांक २२.५.२०१७ मधील तरतुदीचे पालन करुन व शासन निर्णय दिनांक ११.१.२०१८ मधील दिलेल्या तरतूदीचा विचार करुन तसेच नागरी सेवा मंडळानी केलेल्या शिफारशी विचार करुन वनरक्षक व वनपालांचे बदलीचे प्रस्ताव सादर करावा.

तरी बदली धोरण दि.२२.५.२०१७ मधील तरतूदीचे उल्लघंन करुन वनरक्षक व वनपालांचे बदली केल्याचे निदर्शनास आल्यास सदरील बदली रद्द करुन तरतूदीचा भंग करुन बदली करणा-या विरुध्द कडक धोरण अवलंबून त्यांचे विरुध्द मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यांनी कडक कार्यवाही करावी. याबाबत उपरोक्त सूचनेनुसार कार्यवाही करणेबाबत आपले अधिनस्त कार्यालयाना कळविण्यात यावे व शासनाच्या सूचनेनुसार बदली प्रकरण हाताळले जातील यासाठी पाठपुरावा करावा.

(ए.आर.मंडे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

प्रतिलिपी(ईमेलव्दारे)

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन,शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्यआयोजना-पश्चिम, महाराष्ट्र राज्य,पुणे.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व-नागपूर, पश्चिम-मुंबई.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष-मुंबई.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.

५) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प नागपूर, चंद्रपूर व कोल्हापूर.

६) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे/

७) मुख्य वनसंरक्षक कार्यआयोजना-पूर्व,नागपूर.

७) वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे, नाशिक/

८) क्षेत्रसंचालक नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया.

९) वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण,सर्व

१०) वनसंवर्धनतज्ञ,पुणे.